**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशभरात सुरू असलेल्या जीएसटी बचत महोत्सवामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह असल्याचं पंतप्रधानांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन.**
2. **राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार २०२५ जाहीर: प्रा.जयंत विष्णू नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार, विज्ञानश्री पुरस्कारासाठी आठ शास्त्रज्ञांची निवड.**
3. **सिंचन विहिरी धडक कार्यक्रमास ३१ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ; नागपूर विभागातील ३८६ अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यास महसूल विभागाची मान्यता.**
4. **राज्याच्या काही भागांत पावसामुळे पिकांना मोठा फटका, बहुतेक जिल्ह्यांमध्ये आज यलो अलर्ट.**
5. **आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा बांगलादेशविरुद्ध गोलंदाजी करण्याचा निर्णय.**

**मन की बात**

देशभरात सध्या जीएसटी बचत महोत्सव सुरू असून यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १२७ वा भाग होता. यंदाच्या सणासुदीच्या काळात स्वदेशी वस्तूंची खरेदी प्रचंड वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं. कोणकोणती स्वदेशी उत्पादनं आपण खरेदी केली, याबद्दल नागरिकांनी संदेश पाठवून कळवल्याचंही पंतप्रधानांनी सांगितलं.

***GST बचत उत्सव को लेकर भी लोगों में बहुत उत्साह है । इस बार त्योहारों में एक और सुखद बात देखने को मिली । बाजारों में स्वदेशी सामानों की खरीदारी जबरदस्त तरीके से बढ़ी है । मैंने अपने पत्र में खाने के तेल में 10 प्रतिशत की कमी करने का भी आग्रह किया था, इस पर भी लोगों ने बहुत सकारात्मक रुख दिखाया है ।***

ऑपरेशन सिंदूरनं प्रत्येक भारतीयाला अभिमानानं भारून टाकलं आहे. कधीकाळी नक्षलवाद्यांच्या दहशतीखाली असलेल्या प्रदेशांमध्येही नक्षलवादाविरोधातल्या कारवाईमुळं यंदाच्या सणात आनंदाचे दीप प्रज्वलित झाले, असं सांगून, नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करायच्या ध्येयाचा पुनरुच्चार त्यांनी केला. भारतीय वंशाचे श्वान आजूबाजूच्या परिस्थितीशी सहजपणे जुळवून घेणारे असतात, त्यामुळे, यापूर्वी देशवासीयांना आणि सशस्त्र दलांना भारतीय जातीचे श्वान पाळायचं आवाहन केल्याचं स्मरण पंतप्रधानांनी करून दिलं. त्याला प्रतिसाद देत सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं पथकांमध्ये भारतीय वंशाच्या श्वानांची संख्या वाढवल्याची माहिती त्यांनी दिली, तसंच सीमा सुरक्षा दलानं श्वानांना भारतीय नावं द्यायची परंपरा सुरू केल्याचंही त्यांनी सांगितलं. याद्दृष्टीनंच महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या मुधोळ

हाउंड, आणि उत्तर प्रदेशातल्या रामपूर हाउंड या जातीच्या श्वानांना प्रशिक्षण देत असल्याची माहिती त्यांनी 'मन की बात'मधून दिली.

***BSF और CRPF ने अपने दस्तों में भारतीय नस्ल के Dogs की संख्या बढ़ाई है | Dogs की training के लिए BSF का National Training Centre ग्वालियर के टेकनपुर में है | यहाँ उत्तर प्रदेश के रामपुर हाउंड, कर्नाटक और महाराष्ट्र के मुधोल हाउंड इस पर विशेष रूप से focus किया जा रहा है | इस Centre पर trainers technology और innovation की मदद से श्वानों को बेहतर तरीके से train कर रहे हैं |***

आपणही जिथं राहतो तिथं झाडं लावावीत, एक पेड़ माँ के नाम ही मोहीम आणखी पुढे न्यावी, असं आवाहनही त्यांनी केलं. येत्या ३१ ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनाचं स्मरण करून, पंतप्रधानांनी पटेल यांच्या योगदानाला उजाळा दिला. यानिमित्त देशभरात आयोजित होणार असलेल्या ‘रन फॉर युनिटी’ मध्ये सहभागी व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.येत्या ७ नोव्हेंबर रोजी ‘वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाला प्रारंभ होणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि या गीताचं महत्त्व विषद केलं. यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि यासाठी नागरिकांनी आपल्याला सूचना पाठवाव्यात, असं आवाहनही केलं.

**पंतप्रधान आसियान परिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज २१ वे शतक हे भारत आणि आसियानचं शतक असल्याचं सांगितले. मलेशियात सुरू असलेल्या आसियान-भारत शिखर परिषदेला आभासी पद्धतीने संबोधित करताना मोदी यांनी अधोरेखित केले की भारत आणि आसियान एकत्रितपणे जगातील जवळजवळ एक चतुर्थांश लोकसंख्येचं प्रतिनिधित्व करतात. ते पुढे म्हणाले की भारत आणि आसियान केवळ भूगोल सामायिक करत नाहीत तर खोल ऐतिहासिक संबंध आणि सामायिक मूल्यांच्या धाग्याने देखील ते जोडलेले आहेत. अनिश्चिततेच्या या काळातही, भारत-आसियान व्यापक धोरणात्मक भागीदारीने सतत प्रगती पाहिली आहे. ही मजबूत भागीदारी जागतिक स्थिरता आणि विकासासाठी एक मजबूत पाया म्हणून उदयास येत आहे. भारत प्रत्येक आपत्तीत आपल्या आसियान मित्रांसोबत खंबीरपणे उभा राहिला आहे, असंही त्यांनी सांगितले. सागरी सुरक्षा आणि नील अर्थव्यवस्थेत सहकार्य वेगाने वाढत आहे, असं सांगून त्यांनी २०२६ हे वर्ष ‘आसियान-भारत सागरी सहकार्य वर्ष’ म्हणून घोषित केले.

**राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार**

राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार २०२५ आज जाहीर करण्यात आले. प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार देण्यात येणार आहे. विज्ञानश्री पुरस्कारासाठी आठ शास्त्रज्ञांची निवड करण्यात आली आहे. विज्ञान युवा श्रेणी अंतर्गत,

विविध विषयांमध्ये १४ तरुण शास्त्रज्ञांची निवड करण्यात आली आहे, तर कृषी विज्ञानातील योगदानासाठी टीम अरोमा मिशन सीएसआयआरला विज्ञान चमू पुरस्कार देण्यात येत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रमातील अपवादात्मक योगदानासाठी हे पुरस्कार विज्ञानरत्न, विज्ञानश्री, विज्ञान युवा-शांतीस्वरूप भटनागर आणि विज्ञान चमू अशा चार श्रेणींमध्ये दिले जातात. दरम्यान, नागपूरच्या राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था निरिचे संचालक डॉ. एस. वेंकटमोहन यांना वर्ष 2025 मध्ये पर्यावरण विज्ञान क्षेत्रात 'राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार-विज्ञानश्री' साठी निवडण्यात आलं आहे. त्यांना यापूर्वी शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार, कलाम टेक्नोलॉजी इनोव्हेशन नॅशनल फेलोशिप, आणि डीबीटी-टाटा इनोव्हेशन फेलोशिप यांसारखे पुरस्कारही मिळाले आहेत.

**सिंचन विहीर**

नागपूर विभागातील सिंचन विहिरीच्या धडक कार्यक्रमास शासनाने ३१ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळून अपूर्ण विहिरींची कामे आता वेगाने पूर्ण होण्यास मदत होणार आहे. नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमधील ३८६ अपूर्ण सिंचन विहीरींना मुदतवाढ देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शासनाला पाठविलेल्या पत्रानंतर घेण्यात आला. शासनाने यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केले असून, या सर्व विहिरी ३१ मे २०२६ पूर्वी पूर्ण करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, ३१ मे २०२६ नंतर ही योजना पूर्ण झालेली समजली जाईल. तसेच, जून ते सप्टेंबर २०२५ या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे खचलेल्या आणि बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीच्या कामासही शासनाची मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना सिंचनाच्या साधनांबाबत मोठा दिलासा मिळणार असून शेती उत्पादनात वाढ होणार असल्याचं महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे.

**हवामान**

हवामान! राज्याच्या काही भागात आलेल्या पावसानं अनेक ठिकाणी शेतीमालाचं मोठं नुकसान झालं. गोंदियात पावसानं धान पिकाला मोठा फटका बसला. पावसामुळे कापणीला आलेले भाताचं पीक आडवं झालं. राज्याच्या बहुतांश भागांत आज हवामान विभागानं यलो अलर्ट दिला आहे. नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या माहितीनुसार येत्या ४८ तासांत नागपूर, वर्धा, अमरावती आणि गोंदिया जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळ आणि तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता असून इथं पर्जन्यमानाचा येल्लो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यवतमाळ आणि अकोला जिल्ह्यांतही तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

महिला क्रिकेट स्पर्धा

**क्रिकेट!** आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धा २०२५ मध्ये भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरने नवी मुंबईत स्पर्धेच्या त्यांच्या शेवटच्या साखळी सामन्यात बांगलादेशविरुद्ध नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पावसामुळे उशिरा सुरू झालेल्या सामन्यामुळे सामना ४३ षटकांचा मर्यादित करण्यात आला आहे. बांग्लादेशने फलंदाजीला येतांना ११ षटकात २ गडीबाद ३६ धावा केल्या आहेत. या स्पर्धेत आत्तापर्यंत भारतानं एकंदर सहा सामन्यांपैकी तीन सामने जिंकले आहेत, तर तीन सामन्यांमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला. भारत ६ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर आहे, तर बांगलादेशनं ६ सामन्यांपैकी फक्त एक सामना जिंकला असून त्यांचा संघ गुणतालिकेत शेवटच्या स्थानावर आहे. भारतीय महिला संघ यापूर्वीच उपांत्य फेरीत पोहोचला असून त्यांचा सामना नवी मुंबईतच येत्या गुरुवारी 30 ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाशी होणार आहे.

**डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साताऱ्याच्या फलटण उपजिल्हा रुग्णालयातल्या डॉ.संपदा मुंडे यांच्या आत्महत्येबद्दल दुःख व्यक्त केलं, तसंच त्यांच्या आत्महत्येला जबाबदार असणाऱ्यांना शिक्षा होईल, असं आश्वासन दिलं. नीरा देवधर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या लोकार्पणासह फलटण इथल्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकरणात काही जणांनी राजकारण करत माजी खासदार रणजीत नाईक निंबाळकर आणि आमदार सचिन पाटील यांचं नाव गोवण्याचा प्रयत्न केला, मात्र असं असतं तर आपण या कार्यक्रमाला आलो नसतो, असं सांगत मुख्यमंत्र्यांनी निंबाळकर आणि कांबळे यांच्यावरचे आरोप फेटाळून लावले. दरम्यान, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी मृत डॉक्टरांच्या कुटुंबीयांची बीड मधल्या कवडगाव इथं भेट घेतली आणि त्यांचं सांत्वन केलं. डॉ. संपदा यांचा मृत्यू वेदनादायी असून, त्यांना न्याय मिळवून देऊ. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही पाठपुरावा करू, असं आश्वासन त्यांनी दिलं.

**वाघ संचार**

अमरावतीच्या मेळघाट येथील धारणी तालुक्यातील केकदाखेडा आणि कावडाझिरी शेतशिवारात वाघाने दोन वासरू आणि बैल या पाळीव जनावरांची शिकार केल्याने जवळपासच्या गावात सुद्धा दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

*****